## नि.दि.दा.नंबर ७१/२०२४ मधील निशाणी ५९ चे अर्जावरील आदेश.

## (शहाजी देसाई वगैरे वि. दिपाली भोसले वगैरे )

प्रस्तुतचे अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिलेला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे:–**

२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तूत अर्जाद्वारे वादी दाव्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छीत आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार सदरच्या घडामोडी या दावा प्रलंबित असताना घडलेल्या असून सदर दाव्याचा गुण दोषावरती निकाल होण्याकरीता सदर दुरूस्ती दाव्यामध्ये करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरच्या दुरस्ती केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदतच होणार आहे.

सदर दुरुस्त्या खालील प्रमाणे –

१. दावा कलम २ मध्ये वाद मिळकतीच्या मुख्यअधिकारी, कवठे महांकाळ यांच्या आदेशान्वये एकूण पाच भुखंड पडलेले असून त्यानुसार वादी बिनशेती असा उल्लेख करु इच्छीत आहे. तसेच भुखंडामध्ये वादीने बांधकाम केलेल्या इमारतीबाबतचा मजकूर यामध्ये समाविष्ट आहे.

२. दावा कलम ६.९ नंतर वादी क्र. ३ सुनंदा मारुती शिंदे यांनी दिनांक १३ मे २०२४ रोजी कवठे महांकाळ पोलीस ठाणे येथे तक्रार दिलेबाबतचा मजकूराचा

समावेश आहे,

३. दावा कलम ६.१३ नंतर दिनांक १६.११.२०२४ रोजी वाद मिळकतीवर घडलेल्या घटनेचे विस्तृत वर्णन केलेले आहे,

४. दावा कलम ६.१५ दि. २१.११.२०२४ रोजीचे न्यायालयाचे जैसे थे आदेशाबाबत कथने आहेत,

५. दावा कलम ६.१६ दि. २८.१२.२०२४ व दि. २९.१२.२०२४ रोजीच्या वादी मिळकतीवर घडलेल्या घटनेबाबत वर्णन केले आहे,

६. ६.१७ दि. २८.१२.२०२४ रोजी प्रतिवादी विरुध्द दाखल एन.सी.आर. बाबत वर्णन केले आहे,

७. ६.१८ दि. ०२.०२.२०२५ रोजी वादीने प्रतिवादींना विधिज्ञांमार्फत पाठवलेल्या नोटीसीबाबत वर्णन केले आहे,

८. ६.१९ तक्रार रजिस्टर नं. २७/२०२४ बाबत वर्णन केले आहे,

९. ६.२० आरटीएस अपील नं. ८३३/२०२४ दि. ०२.०१.२०२५ रोजी फेटाळल्याबाबत नमुद केले आहे,

१०. ६.२१ फेरफार क्र. २६०५९ नोंदवल्या बाबत वर्णन केले आहे,

११. ६.२२ दावा मिळकत गुंठेवारी/नियमानुकुल/एस आर/ ११२/२०२५ बाबत मजकूर ,

१२. ६.२३ फेरफार क्रमांक २६९४० बाबत मजकूर,

१३. दावा कलम १२ मध्ये दाव्यास कारण घडल्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हिने वादी विरुध्द स्पे. दि. मु. नं. १११/२०१४ दाखल केला त्यावेळीचे समजपत्र समाविष्ट करण्याबाबत मजकूर.

वर नमुद एकूण १३ घटकामध्ये वादी दुरूस्ती करु इच्छीत आहे. त्याचे विस्तृत वर्णन अर्जामध्ये केलेले आहे.

**३.** प्रतिवादींना पुरेशी संधी देवून देखील प्रस्तूत अर्जावर म्हणणे सादर केलेले नाही. सबब प्रस्तूतचा अर्ज विना म्हणणे चालवण्यात आला.

**४.** वरील कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी प्रस्तुत अर्जाद्वारे सुचवत असलेल्या दुरुस्ती या दावा दाखल केल्या नंतरच्या घटनांवर आधारित आहे. प्रकरणामध्ये अद्याप पुरावा होणे बाकी असल्यामुळे सदरच्या घडामोडीबाबत वादीस सदरच्या बाबी पुरावा देवून सिध्द करने आवश्यक

आहे. प्रतिवादींना देखील या बाबींवर पुराव्या देण्याची संधी मिळणार आहे. सबब अर्ज मंजूर केल्यास त्याचा कोणताही विपरित परिणाम प्रतिवादींवर होणार नाही. याउलट अर्जामध्ये तथ्य नाही असे समजून अर्ज नामंजूर केला तर उपरोक्त घडामोडींबाबत चौकशी विना फेटाळल्यास त्याचा विपरीत परिणाम वादीवर होवू शकतो. परंतु झालेला विलंब विचारात घेता वादींनी खर्चाची रक्कम म्हणून रुपये ५००/– (पाचशे फक्त) ही तालुका विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडे जमा करावेत. असे प्रामाणिक मत व्यक्त करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस, अर्जामध्ये नमुद दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादींनी त्या अनुशंगाने दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन, दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

४. वादींनी खर्चाची रक्कम म्हणून रुपये ५००/– (पाचशे फक्त) ही तालुका विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडे जमा करावेत.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.12.09 10:51:09 +0530

**(एम. ए. कुलकर्णी )**

**दिनांक: ०८.१२.२०२५**

**सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,**
**कवठेमहांकाळ.**

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | **08.12.2025** |
| Order /judgment signed by P.O. on | : | **08.12.2025** |
| Order /judgment uploaded on | : | **09.12.2025** |